लोकमत
शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिन निमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत बापूजी साळुंखे यांचे मोलाचे योगदान

## पंकज भोयर : ३८ व्या स्मृतिदिननिमित्त कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक असलेली संस्था असून, त्यांच्यामुळे डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार अध्यक्षस्थानी होते.

राज्यमंत्री भोयर पुढे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १२ जिल्हे आणि बेळगावसह एकूण १४ जिल्ह्यांत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी निर्माण केलेल्या संकुलांमधून त्यांचा द्रष्टेपणा दिसतो. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी स्वागत केले. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सीताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, उपाध्यक्ष अविनाश पाटील, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी उपस्थित होते. (वा.प्र.)

लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शिक्षणशास्त्र अधिविभाग येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या उपस्थितीत पुष्पहार व पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आदी उपस्थित होते.

# समाज घडविण्याची शिक्षकांवर मोठी जबाबदारी

## शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर; शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यामुळेच महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. विद्यार्थ्यांना बहुज्ञानशाखीय शिक्षणाला सामोरे जावे लागणार आहे. या अस्वस्थ वर्तमानाच्या काळात बापूजींच्या विचारांचे स्मरण व अंगीकार करायला हवा. बापूजींना अभिप्रेत असणारा शिक्षकच चांगला समाज घडवू शकतो, असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी कवी अविनाश भारती यांचे 'आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा' या विषयावर व्याख्यान झाले. ते



**कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर. समवेत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कौस्तुभ गावडे आदी.**

**(छाया : नाज ट्रेनर)**

म्हणाले, ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हा ध्येयवाद सर्वांनी आचरणात आणून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान द्यावे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांनी तो विश्वास सार्थ करावा. तरच, येणाऱ्या काळात सुजाण नागरिक घडतील.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणातील संधी व आव्हाने ओळखून शिक्षण क्षेत्रात अव्याहत कार्य केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना शिक्षकांनी सजग असणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान शिक्षकांनी स्वीकारले पाहिजे. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शाळा सिद्धी मूल्यमापन अंतर्गत विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सहसचिव (प्रशासन) सीताराम गवळी यांनी आभार मानले. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश पाटील, संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

11-8-25

तरुण भारत संवाद

शनिवार, ९ ऑगस्ट २०२५

# डॉ. साळुंखेंचे महाराष्ट्राच्या जडण-घडणीत योगदान

- राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांचे प्रतिपादन
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर, सोबत शुभांगी गावडे, अभयकुमार साळुंखे, अविनाश भारती, कौस्तुभ गावडे, डॉ. आर. आर. कुंभार आदी.

प्रतिनिधी

कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक असलेली शिक्षण संस्था आहे. महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

भोयर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १२ जिल्हे आणि बेळगावसह १४ जिल्ह्यात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यामुळे बापूजींचे द्रष्टेपण त्यांनी खेडोपाड्यात निर्माण केलेल्या संकुलांमधून दिसते. कवी व व्याख्याते अविनाश भारती म्हणाले, बापूजींनी सांगितलेला 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' या ध्येयवादाचे आचरण केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांनी तो विश्वास सार्थ करावा. तरच सुजाण नागरिक घडतील. बापूजींची प्रार्थना, शैक्षणिक विचार आणि तत्वज्ञानामधील मार्गदर्शक तत्वांचा संदर्भ नव्या शैक्षणिक धोरणात आहे. बापूजींच्या सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा या पंचसुत्रीचा अवलंब केला पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शाळा सिध्दी मूल्यमापन अंतर्गत विजेते म्हणून प्रथम क्रमांक विवेकानंद कॉलेज, व्दितीय क्रमांक जतमधील राजे रामराव महाविद्यालय, तृतीय क्रमांक तासगावातील पद्मभुषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाल येथील कलाशिक्षक विजयकुमार शिंगण यांनी शिवराज्याभिषेक रांगोळी काढून लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला.

संस्थेच्या कला शिक्षकांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले. स्वागत, प्रास्ताविक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. आभार संस्थेचे सहसचिव (प्रशासन) सीताराम गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, उपाध्यक्ष अविनाश पाटील, सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुंजरे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आदी उपस्थित होते.